# K. G. MITTAL AYURVED COLLEGE,

(Hindi Linguistic Minority Institution)
Marine Drive, N.S.Road. Mumbai-400 002.
[Phone No.022-69088000 Mail :-kgmpacollege@gmail.com, Web.:-www.kgmittalayurvedcollege.com]

## WANTED

Applications are invited in the prescribed format from the eligible candidates for the following posts

**Associate Professor/Assistant Professor**

Requisite Qualifications, Experience, Other details and prescribed application Form available on University website :-www.muhs.ac.in

**Last date of application is 13/02/2026 upto 5 p.m.**

**Note:-**

1)Application form is available at College website www.kgmittalayurvediccollege.com
2)Application Form Fee with D.D.of Rs.1000/- for Open Category and Rs.500/- for Reserve Category
3) DD in favour of – K .G. Mittal Ayurvedic College.

Sd/-
**SECRETARY**

K. G. MITTAL AYURVED COLLEGE

मित्तल फाऊंडेशन ट्रष्ट

# के. जी. मित्तल आयुर्वेद कॉलेज

नेताजी सुभाष रोड, मरीन ड्राईव्ह, मुंबई -४०००२.
(दूरध्वनी क्रं. ०२२-६९०८८०००/२२८१२४६८ ईमेल:-kgmpacollege@gmail.com)
Website:-www.kgmittalayurvediccollege.com

## जाहिरात
## सरळसेवा पदभरती प्रक्रिया २०२५

**मित्तल फाऊंडेशन ट्रस्ट** संचालित **के.जी.मित्तल आयुर्वेद कॉलेज, मरीन ड्राईव्ह, मुंबई-४००००२** येथे महाराष्ट्र शासन अनुदानित **सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक** संवर्गातील शासन मान्य भरावयाच्या एकुण ०४ रिक्त पदे भरण्याकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशिल, शासनाच्या नियमानुसार संवैधानिक आरक्षण व समांतर आरक्षण आणि अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना इत्यादीची सविस्तर माहिती पुढील खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.
सरळसेवा पद भरती करावयाची विषयनिहाय पदे-

| अ.क्रं. | पदनाम | विषय | शासनमान्य मंजूर पद |
|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक | आयुर्वेद सहिंता सिध्दान्त | ०१ |
| २ | सहयोगी प्राध्यापक | प्रसुती एवं स्त्री रोग | ०१ |
| ३ | सहाय्यक प्राध्यापक | कायचिकित्सा | ०१ |
| ४ | सहाय्यक प्राध्यापक | रोग निदान विकृती विज्ञान | ०१ |

प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्तता करणाऱ्या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. **अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ. क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ५.०० वाजे पर्यंत |
| २ | अर्ज नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजे पर्यंत |
| ३ | मुलाखतीचा दिनांक | पात्र उमेदवारांना पत्राद्वारे कळविण्यात येईल |

४. **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी –**

या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्रं. असैसं-२००९/७२२/प्र.क्रं.३९/२००९/का-१ दिनांक ७.५.२००९ अन्वये हिंदी भाषिय अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झाल्याने शासन परिपत्रक क्रं. असैसं-२००८/४४७/प्र.क्रं.५६/२००८/का-१ दिनांक ४.५.२००९ नुसार महाविद्यालय व रुग्णालयास कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागु होत नाही.

४.१ सेवाप्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव(खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी संस्थेच्या व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४.२ अराखीव(खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जांमध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

K. G. MITTAL AYURVED COLLEGE

४.३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण अधिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण अधिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.३.१ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवारांकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागु असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

५. **वेतनश्रेणी :**

**७** व्या वेतन आयोगानुसार निर्धारीत केलेली वेतनश्रेणी

| पद | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|
| वेतनश्रेणी | Academic level १३A<br>(रु.१३१४००- २१७१००)<br>व अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते | Academic level १०<br>(रु.५७७००-१८२४००)<br>व अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते. |

## ६. सर्वसाधारण अटी व शर्ती

६.१. भारतीय नागरिकत्व

६.२. वयोमर्यादा

| पदाचे नाव | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय अमागास / मागासवर्गीय / आ.दु.घ. | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | प्राविण्यप्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | अराखीव | मागासवर्गीय / आ.दु.घ. / अनाथ | |
| सहयोगी प्राध्यापक | अर्ज करण्याची शेवटची तारीख | १९ | ५० | ५० | ५० | ५५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ५० |
| सहाय्यक प्राध्यापक | अर्ज करण्याची शेवटची तारीख | १९ | ४० | ४५ | ४३ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

६.२.१ जे उमेदवार शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवारांच्या बाबतीत प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक संवर्गाकरीता वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल.

६.२.२ मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील

६.३. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव

| अ. क्र. | पद | शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्राधान्यशील अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सहयोगी प्राध्यापक | • ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.२८) याला जोडलेल्या अनुसूचीतील भाग अ, अ-१, ब किवा क यांमध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल,<br>• ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल | ज्यांना आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून तीन वर्ष अध्यापनाचा अनुभव असला पाहीजे. | ज्या उमेदवारांचे मुळ शोध निबंध हे भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल |

K. G. MITTAL AYURVED ★ COLLEGE ★

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहाय्यक प्राध्यापक | • ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा.२८) याला जोडलेल्या अनुसूचीतील भाग अ, अ-१, ब किवा क यांमध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल,<br>• ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल | -- | -- |

६.४. शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक : १३/०२/२०२६

६.४.१. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

६.४.२. अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

७. अर्ज करण्याची पध्दत:-

संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार, दिनांक १३/०२/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षाकिंत प्रती व डिमांड ड्राफ्ट सह आवेदनपत्र समक्ष अथवा पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवावीत.

## ८. निवडप्रकिया -

**८.१.** महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम) २०२१ नुसार निर्गमित उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. ९४/१९/ विशि-१, दि.११.०४.२०२२ मध्ये, नमुद कार्यपध्दतीनुसार पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**८.२.** जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची संख्या विहित कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

**८.३.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

**८.४.** मुलाखतीमध्ये किमान ४५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

**८.५.** सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया प्राध्यापक गट-अ, सहयोगी प्राध्यापक गट-अ व सहायक प्राध्यापक गट-ब महाराष्ट्र आयुर्वेदिक सेवा, पदांचे सेवाप्रवेश नियम 2013, दि.२६.०७.२०१३ आणि तदनंतर शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**८.६.** अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या उमेदवाराची क्रमवारी (Ranking) शासनाचे विहित तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

## ९. आवश्यक कागदपत्रे (मुळ कागदपत्रे व स्वयं साक्षांकीत प्रतीसह)

९.१ अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)

९.२ वयाचा पुरावा (एस.एस.सी. किंवा नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका किंवा अन्य शासकीय प्राधिकरणाने दिलेला जन्मदाखला)

९.३ शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा

K. G. MITTAL AYURVED COLLEGE

९.४ एस.एस.सी. प्रमाणपत्रातील नावात बदल झाला असल्यास त्याचा पुरावा

९.५ मराठी, हिंदी, संस्कृत इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा

९.६ लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन

९.७ विहित अनुभव प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास)

९.८ शासन सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक संशोधन व प्रकाशने (दावा असल्यास)

९.९ अधिवास (Domicile) प्रमाणपत्र

९.१० राज्य शासकीय कर्मचारी/खेळाडू/दिव्यांग/माजी सैनिक/मागासवर्गीय, आ.सु.घ.,अनाथ यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र.

१०. **अर्ज शुल्क :**

१०.१. **अराखीव - रु. १०००/-**

१०.२. **मागासवर्गीय / आर्थिक दुर्बल घटक / अनाथ - रु. ५००/-**

११. **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना**

११.१अर्जदार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा **अधिवासी** असावा. अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्याचा **अधिवासी** असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (Domiciled) असणे आवश्यक आहे.

११.२ अर्जदारास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

११.३ आपण कोणत्या प्रवर्गातील आहोत ते तपासूनच उमेदवारांनी त्या-त्या प्रवर्गात अर्ज भरावा.

११.४ महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अटी व इतर शासन निर्णय वित्त विभाग, संकीर्ण-१०००/ प्र.क्र.७०/सेवा-५, दिनांक ११.०८.२००० नुसार विहित अटी लागू राहतील. याबाबत प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी किंवा प्रत्यक्ष कागदपत्र तसपाणीच्या वेळी असणे अनिवार्य आहे.

११.५ निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही वेळी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती कोणत्याही टप्पयावर रद्द करण्यात येईल.

११.६ शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.७ नियुक्त केलेल्या उमेदवारास शासन निर्णय दि.१०.०८.२०१६ व शासन निर्णय दि.२९.०३.२०२५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (स्तर-१) योजना लागू राहील.

११.८ मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्र तपासणी दरम्यान पात्रतेसंदर्भातील सर्व मुळ कागदपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

११.९ सदरील जाहिरात महाविद्यालयाच्या वेबसाईट www.kgmittalayurvediccollege.com **तसेच** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या www.muhs.ac.in वर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

११.१० काही शंका असल्यास वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या ०२२-६९०८८०००/२२८१२४६८ हेल्पलाईन नंबर वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

१२. **सेवाप्रवेशोत्तर शर्ती-**

नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-

**१२.१** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**१२.२** सन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.), क्रमांकः मातंसं-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३, शासन पूरकपत्र, क्रमांक मातंसं-२०१२/प्रक्र.२७७/३९, दिनांक ०८ जानेवारी, २०१८ व १६ जुलै, २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा. नसल्यास नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अर्हता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१२.१ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा. नसल्यास नियुक्तीनंतर २ वर्षात सदर अर्हता प्राप्त न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१२.२ नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवाराला महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठ्ठावीस) या अन्वये अथवा भारतीय वैद्यकीय केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा अठ्ठेचाळीस) अन्वये नोंदणी करून घ्यावी लागेल. उक्त अधिनियमान्वये ज्या उमेदवारांनी आपली नोंदणी करुन घेतली आहे ते उमेदवार यास अपवाद राहतील.

१२.३ निवड झालेल्या उमेदवारास खाजगी व्यवसाय करण्यास बंदी असेल.

१२.४ सदर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराला तो/ती विवाहित आहे किंवा कसे? हे जाहिर करावे लागेल. विवाहित असल्यास, पुरुष उमेदवारांचे बाबतीत त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी आहेत किंवा कसे? आणि महिला उमेदवारांचे बाबतीत तिने पत्नी हयात असलेल्या पुरुषाशी विवाह केला किंवा कसे? याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. नियुक्तीनंतर असे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे आढळल्यास, सेवेतून बडतर्फ करण्यात येईल.

१२.५ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक क्रमांक-परिवी-२७१४/प्र.क्र३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार परिवीक्षा धोरणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१२.६ संस्थेच्या व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती तसेच जाहिरात अधिकृत समजण्यात यावी.

Sd/-
(स्वाक्षरी)
(वैद्य बालाजी सोपानराव सावंत)
प्र. प्राचार्य

Sd/-
(स्वाक्षरी)
(श्री अरूण मालीराम मित्तल)
जनक संस्था सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक :२३/०१/२०२६

MITTAL AYURVED